**DIRECTORATE OF RESEARCH**
**Dr. Balasaheb Sawant**
**Konkan Krishi Vidyapeeth**
**Dapoli 415 712, Dist. Ratnagiri (M.S.)**
**Mobile : 8275013396**

www.dbskkv.org
ddrbskkv@gmail.com
ddrbskkv@rediffmail.com

**संशोधन संचालनालय**
**डॉ. बाळासाहेब सावंत**
**कोकण कृषि विद्यापीठ**
**दापोली ४१५ ७१२, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)**
**भ्रमणध्वनी : ८२७५०१३३९६**

**जा.क्र.डॉबासाकोकृवि/संशो/बियाणे/जाहिरात/ १७१५ /२०२३** **दिनांक :** 10 NOV 2023

## जाहिरात

संशोधन संचालनालयांतर्गत कार्यान्वित असलेल्या बियाणे विभाग येथे **निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात** अकरा महिने कालावधीकरीता खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणेची वाहन चालक भरण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह पात्र उमेदवारांकडून **दिनांक ३०.११.२०२३** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | एकत्रित वेतन प्रती महिना (रू.) | नेमणुकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | वाहन चालक | ०१ | १५,०००/- | ११ महिने |

पदासाठी पात्रता :-

| | |
|---|---|
| वाहन चालक | अ) इयत्ता ८ वी पास, जड वाहन चालविण्याचा सक्षम प्राधिका-याने दिलेला परवाना **किंवा**<br>ब) इयत्ता ४ थी पास व जड वाहन चालविण्याचा सक्षम प्राधिका-याने दिलेला परवान्यासह ५ वर्षाचा जड वाहन चालविण्याचा अनुभव **किंवा**<br>क) या विद्यापीठात सेवेत वाहनचालक म्हणून तात्पुरत्या/रोजंदारी स्वरूपात काम करीत असलेल्यांसाठी १० वर्षे किंवा त्याहून जास्त अनुभव, तसेच जड वाहन चालविण्याचा सक्षम प्राधिका-याने दिलेला परवाना. |

**नियम व अटी :**

१. वयाची मर्यादा :- अर्जदाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (अनुसुचित जाती/जमातीच्या अर्जदारांना नियमानुसार वयाच्या मर्यादेमध्ये सवलत दिली जाईल).
२. अर्जदाराने सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये माहिती भरून **संशोधन संचालक, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली** यांचे नावाने व त्यांचे कार्यालयात **दिनांक ३०.११.२०२३** पुर्वी पोहोचतील अशाप्रकारे पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
३. अर्जाच्या लखोटयावर वाहन चालक पदासाठी अर्ज असा उल्लेख करावा.
४. पात्र उमेदवारांच्या निवड समितीव्दारे मुलाखती तसेच प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येतील.
५. मुलाखीला येताना अर्जाला जोडण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणाव्या लागतील.
६. मुलाखतीला बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना प्रवास तसेच दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
७. निवड झालेल्या उमेदवाराला नेमणुकीच्या आदेशातील सर्व अटि व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा विहित नमुन्यात रू. १००/- रकमेच्या बाँड पेपरवर लिहून दयावा लागेल.
८. निवड झालेल्या उमेदवाराला अकरा महिने किंवा प्रकल्पाच्या कालावधीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.

**कृ.मा.प.**

Scanned with ACE Scanner